**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प (मैदानी प्रदेश) गणेशखिंड, पुणे ६७**

---

**निविदा**

१ **ओळख** - राकृसंप्र, गणेशखिड, पुणे हे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांचे अधिनस्त असून या कार्यालयातून आंबा, चिक्कू, पेरु, डाळींब, सिताफळ, मोसंबी इ. कलमांची विक्री होत असते. सदर कलमे तयार करण्यासाठी सदर ई-निविदा राबविण्यात येत आहे.

२ **प्रक्रिया** - ई-निविदेत सहभाग घेताना ई-निविदा संदर्भातील सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करणे हे संबंधीत निविदा धारकाचे आहे. तांत्रिक अडचणींमुळे होणा-या त्रुटीबद्दल हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. अटी व शर्ती या पूर्णरित्या वाचून मगच मान्य म्हणून स्वाक्षरी करावी.

३ **देय रक्कम -**

**पहिला हप्ता -**

- आंबा, चिक्कु, सिताफळ, पेरु यांची बांधलेली व मोसंबी यांची डोळा भरलेली कलमे फुटल्यानंतर, फुटलेल्या कलमांच्या आधारे ३० टक्के प्रतिकलम रकमेचा असेल.
- पेरु दाब कलमे दाबल्यानंतर दाबलेल्या कलमांच्या आधारे ३० टक्के प्रति कलम रकमेचा असेल.
- पेरु-चिक्कु (खोगीर कलम) तसेच डाळींब गुटी कलमे बांधण्याचे काम पुर्ण झाल्यावर एकुण व्यवस्थीत दाबलेल्या व बांधलेल्या कलमांच्या आधारे ३० टक्के प्रती कलम रकमेचा असेल.

**दुसरा हप्ता**

- आंबा, चिक्कु, सिताफळ, पेरु (शेंडा कलम) यांची बांधलेली व मोसंबी डोळा कलमांचे पहिल्या हप्त्याच्या बिलांच्या तारखेपासुन दोन महिन्यांनी जगलेल्या कलमांच्या आधारे ४० टक्के प्रतिकलम रकमेचा असेल.
- पेरु दाब/भेट कलमे व चिक्कु (खोगीर कलम) तसेच डाळींब गुटी कलमे झाडावरुन उतरल्या नंतर एक महिण्यांनी जगलेल्या कलमांच्या आधारे ४० टक्के प्रती कलम रकमेचा असेल.

**तिसरा हप्ता**

- आंबा, चिक्कु, सिताफळ, पेरु (शेंडा कलम) यांची बांधलेली व मोसंबी डोळा कलमांचे दुसऱ्या हप्त्याच्या बिलांच्या तारखेपासुन दोन महिन्यांनी जगलेल्या

कलमांच्या आधारे दोन हप्त्यांचे व इतर अटींमुळे आलेली रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम अदा करणेत येईल.

- पेरु दाब कलमे व चिक्कु (खोगीर कलम) तसेच डाळींब गुटी कलमे दुसऱ्या हप्त्याच्या बिलांच्या तारखेपासुन एक महिन्यांनी जगलेल्या कलमांच्या आधारे दोन हप्त्यांचे व इतर अटींमुळे आलेली रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम अदा करणेत येईल.

४. **तांत्रिक पूर्तता** - प्रपत्रात नमूद सर्व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे तसेच सोबत जोडलेल्या प्रपत्र अ नुसार नियम व अटी मान्य करुन स्वाक्षरी करुन प्रपत्र जोडावेत.

**प्रपत्र-अ**

**1) Technical Bid Document format**

| अ.क्र. | **प्रमाणपत्राचा तपशील** | **होय** | **नाही** |
|---|---|---|---|
| १. | मा.श्री........................................यांचे माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अथवा नोंदणीकृत नुतनीकरणासह अथवा सत्यप्रत. | | |
| २. | पॅन कार्डची छायांकित सत्यप्रत. | | |
| ३. | कमीत कमी मागील ३ वर्षाचा विद्यापीठात अथवा शासकीय/निमशासकीय कार्यालय/संस्था येथे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्राची सत्यप्रत. | | |
| ४. | निविदाधारकाचे कोणत्याहीशासकीय/निमशासकीय/महामंडळाच्या काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याचे स्वंयघोषित प्रमाणपत्र | | |
| ५. | निविदा प्रणाली भरण्यात आलेल्या बयाना रक्कमेची पावती | | |
| ६. | निविदा समितीने निश्चिती केलेल्या नियम व शर्ती अटी मान्य असल्याचे प्रमाणपत्र | | |
| ७. | मागील तीन आर्थिक वर्षात आयकर भरलेले असल्यास विवरणपत्राची सत्यप्रत | | |
| ८. | जी.एस.टी. नोंदणी क्रमांक लागू असल्यास तसे प्रमाणपत्र | | |

निवीदाधारकाची सही , नाव व पुर्ण पत्ता

सही --------------------------------

नाव --------------------------------

पत्ता --------------------------------

--------------------------------

## ५. वित्तीय पूर्तता

**प्रपत्र ब**

**2.Commercial Bid Document format**

| अ.क्र. | **प्रमाणपत्राचा तपशील** | **होय** | **नाही** |
|---|---|---|---|
| १. | दरपत्रकात दर भरल्याची स्कॅन कॉपी. | | |
| २. | ऑनलाईन प्रणालीमध्ये दर नमुद करणे. | | |

निवीदाधारकाची सही , नाव व पुर्ण पत्ता

सही --------------------------------

नाव --------------------------------

पत्ता --------------------------------

--------------------------------

निविदा पत्रका विषयी नियम व अटी शर्ती

१. केवळ पात्र ठेकेदारांना ऑनलाईन निविदा भरता येईल. यासाठी https://maharashtra.etenders.in sub portal ADF Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri, Ahmednagar या पोर्टलवर नोंदणी करून कागदपत्र डाउनलोड करून निविदा प्रक्रियेत सहभागी होता येईल.

२. निविदा पत्रकासंबंधीची सविस्तर माहिती **मा. सहयोगी संशोधन संचालक,राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, गणेशखिंड, पुणे - ४११०६७** यांचे कार्यालयात विनामुल्य मिळेल.

३. निविदा पत्रकाची किंमत, बयाना रक्कम, सेवा शुल्क, ऑनलाईन प्रणालीद्वारे भरण्यात यावी.

४. निविदा पत्रकाची किंमत, बयाना रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा विलंब आकार दिले जाणार नाही.

५. निविदा धारकाने ऑनलाईन निविदा डाऊनलोड करून ऑनलाईन प्रणालीद्वारे दर भरावेत.

६. निविदा धारकाने निविदा प्रपत्र अ व ब स्पष्ट व सुवाच्च दिसतील या प्रमाणे भरून सही व शिक्यासहीत स्कॅन करून अपलोड करावे.

७. तांत्रिक व दरपत्रक लिफाफा उघडण्याच्या वेळेस संबंधीत निविदा धारकाने किंवा अधिकृत प्रतिनिधीने दिलेल्या तारखेस व वेळेस मुळ कागद पत्रासह उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

८. वित्तीय लिफाफा उघडण्याची वेळापत्रकात दिलेली वेळ व दिनांकामध्ये ऐनवेळी बदल होवू शकतो.

९. निविदा धारकाची निविदा नामंजूर झाल्यास त्याची बयाना रक्कम त्वरीत परत करण्यात येईल सदर रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

१०. ठेकेदाराने कामगाराचे वेतन रोखीने अदा न करता Account payee cross cheque द्वारे अदा करणे किंवा राष्ट्रीकृत बँकेत खाते उघडून त्याचे मासिक वेतन त्याच्या खात्यात जमा करणे बंधनकारक राहिल.

११. निविदा धारकाने करारनामा लिहून दिल्यानंतर मागणी केल्यानुसार फळपिकांची कलमे कलमे बांधून देणे बंधनकारक राहील.

१२. कंत्राटदाराने निविदेत कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील इतर तरतूदीपेक्षा कमी रक्कम नमूद करू नये. थोडक्यात किमान वेतन कायद्यानुसार कंत्राटी कामगारास वेतन देणे बंधनकारक राहील.

१३. बालमजूर कायद्याचे पालन करणे निविदा भरणाऱ्यावर बंधनकारक राहील.

१४. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेखे (हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद, दैनंदिन कामाची नोंद ई. रजिस्टर) ठेवणे व ते संबधीत अधिकाऱ्यांकडून तपासून घेणे बंधनकारक राहील.

१५. शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियमांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१६. प्रत्येक मजूराला कॉन्ट्रॅक्ट लेबर ऍक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे बंधनकारक असून कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

१७. कंत्राटी मजूरास काम करते वेळी इजा, अपघात अथवा मृत्यू संभवल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदा. विज, पाऊस, भुकंप, वादळामुळे इजा अपघात मृत्यू संभविल्यास त्याची सर्व भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१८. कंत्राटी पध्दतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सब कॉन्ट्रक्टर/कंपनी/ठेकेदार/इतर व्यक्ती यांना देता येणार नाही

१९. पुरविण्यात येणाऱ्या मजूरांचा सामूहिक विमा (Group Insurance) कंत्राटदाराने उतरविणे बंधनकारक राहिल.

२०. निविदा मंजूर झाल्यानंतर कंत्राटदाराने ठरवून दिलेल्या उकत्या पध्दतीने कामाचा करारनामा रू. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर पक्षकार नं. २ म्हणून निविदा समितीने केलेल्या विहीत नमुन्यात त्वरीत करून द्यावा लागेल. त्याचा खर्च पक्षकार नं. २ ने करावा. तसेच सुरक्षा अनामत रक्कम (३.०० टक्के निविदा रक्कमेवर) धनाकर्षाव्दारे भरावी लागेल. नंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

२१. कंत्राटदाराने काम अर्धवट केल्यास उर्वरीत काम कंत्राटदाराच्या सुरक्षा रक्कमे मधून पूर्ण करण्यात येईल. तसेच या वेळी जादा होणारा खर्च (L१ व L२ यांच्या दरातील फरक) देखील सुरक्षा अनामत रक्कमेतून वजा करण्यात येईल.

२२. संबंधित कार्यालयाच्या सुचनेनुसार काम मुदतीत पूर्ण करावे लागेल.

२३. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचे बील अदा केले जाणार नाही.

२४. कामात कुचराई व हलगर्जीपणा, नुकसान झाल्यास दंडासह भरपाई करावी लागेल.

२५. समान निविदा असल्यास त्याबाबत संबंधित सर्व ठेकेदारांशी चर्चा करून निविदा निश्चित करण्यात येतील.

२६. कामे चालू असतांना संबंधीत ठेकेदार किंवा त्याचे प्रतिनिधी यांनी स्वतः कामावर हजर असणे आवश्यक आहे.

२७. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारणे तसेच कोणते कारण न सांगताच निविदा रदद् करण्याचा अधिकार **अध्यक्ष, निविदा समिती तथा मा. सहयोगी संशोधन संचालक,राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, गणेशखिंड, पुणे -६७** यांनी राखून ठेवलेला आहे.

२८. कामाचा आदेश मिळाल्यानंतर काम करण्यास असमर्थ ठरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व दुसऱ्या क्रमांकाच्या लघुत्तम निविदा धारकास प्रथम क्रमांकाच्या निविदा धारकाने नमूद केलेल्या दरात काम करवयाची समर्थता दर्शविल्यास त्यांना काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या निविदा धारकाने असमर्थता दर्शविल्यास तिसऱ्या क्रमांकाच्या लघुत्तम निविदा धारकाने प्रथम क्रमांकाच्या निविदा धारकाच्या दरात काम करावयाची समर्थता दर्शविल्यास त्याना काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील.

२९. कामाचा कालावधी निविदा मंजूर झाल्यापासून पुढील एक वर्षापर्यंत राहील.

३०. संबंधित निविदाधारकाचे देयक पारित झाले नसले तरीही त्यांनी ठेकेदार पध्दतीने लावलेल्या मजूरांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १० तारखे अगोदर स्वतःच्या जबाबदारीने अदा करणे बंधनकारक राहील.

३१. निविदा उघडण्यात आल्यानंतर दराबाबत वाटाघाटीचे अधिकार निविदा समितीकडे राहतील.

३२. निविदेच्या प्रत्येक पानावर निविदाधारकाने स्वाक्षरी करावी. निविदेमध्ये खाडाखोड किंवा उपरीलेखन करू नये.

३३. कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा संपूर्ण अधिकार निविदा समितीस राहील.

३४. निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती निविदा स्विकृत केलेल्या तारखेपासून अमलात येतील.

३५. ज्या ठेकेदाराची कामासाठी निविदा मंजूर होईल त्याला किंवा त्याच्या मजूरांना या प्रक्षेत्रावर निवास, पाणी व वीज इ. प्रकारची व्यवस्था मिळणार नाही.

३६. शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधित निविदा धारकाने भरणे बंधनकारक राहील. दर सर्व कर समाविष्ट करून द्यावेत.

३७. वेळोवेळी निर्गमित होणारे शासकीय आदेश/ परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करणे संबंधित निविदाधारकावर बंधनकारक राहील.

३८. कराराचे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्या संदर्भात अंतिम निर्णय निविदा समितीचा राहील.

३९. कलमे तयार करण्यासाठी लागणारी खुंट रोपे कंत्राट दाराने स्वतः अनावयाची आहेत. त्याची वेगळी किमंत अदा केली जाणार नाही.

४०. कलमे विक्री योग्य होईपर्यंत कामासाठी लागणारे मनुष्यबळ कंत्राटदाराच्या स्वखर्चाने असेल.

४१. कलमे तयार करण्यासाठी लागणारे साहीत्य उदा. पॉलीथीन बॅग, सुतळी, काथ्या, मॉस तसेच लागणारी हत्यारे उदा. चाकु, सिकेटर, फावडे ई. कंत्राटदाराचे स्वतःचे असेल.

४२. आंबा, चिक्कु, सिताफळ, पेरु, मोसंबी ई. कलमे तयार करण्यासाठी लागणाऱ्या डोळया काडया या प्रक्षेत्रावरुन काढण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

४३. चिक्कु कलमे, भेट कलम किंवा खोगीर कलम किंवा शेंडा कलम पध्दतीने खिरणी खुंट रोपांवर बांधावीत.

४४. आंबा कलमे, कोय किंवा शेंडा कलम पध्दतीने रायवळ आंबा रोपांवर बांधावेत तसेच सिताफळ आवळा, पेरु शेंडा कलम पध्दतीने रायवळ खुंट रोपांवर बांधावेत.

४५. पेरु कलमे दाब कलम पध्दतीने पेला किंवा पीशवीत तयार करावीत.

४६. डाळींब कलमे गुटी पध्दतीने तयार करावीत.

४७. कलमे तयार करण्याचे काम कार्यालयातील अधिकऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करावे लागेल.

४८. कलमे बांधुन झाल्यावर त्यांना वेळच्या वेळी पाणी घालणे, फवारणी करणे, त्यांचे राखण करणे, पेरु कलमे दाबलेल्या मातृवृक्षामधील गवत काढणे, ईत्यादी व्यवस्थापनाची कामे करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४९. कलमे तयार करण्याची बिले कामाची प्रगती पाहुन खालील प्रमाणे तिन हप्त्यात अदा करण्यात येईल.

५०. ठेकेदाराने तयार केलेली आंबा, चिक्कुची किमान ७५ टक्के कलमे, डाळींब पेरुची किमान ८० टक्के कलमे आणि सिताफळ, मोसंबीची किमांन ६० टक्के कलमे यशस्वी / विक्रीयोग्य करणे बंधनकारक आहे. त्यापेक्षा यशस्वी कलमांचे प्रमाण कमी झाल्यास कलम काडयांची किंमत विद्यापीठ दरानुसार शेवटचा हप्ता देतांना होणाऱ्या बिलातुन वसूल केली जाईल.

५१. यशस्वी / विक्रीयोग्य कलमे ठेकेदाराणे मोजुन देणे बंधनकारक राहील.

५२. आंबा, चिक्कु व मोसंबी कलम काडया गणेशखिंड पुणे ६७ येथे पुरेशा उपलब्ध न झाल्यास उर्वरीत कलम काडया महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथील प्रक्षेत्रावरून त्या कंत्राटदाराने स्वखर्चाने आनाव्या लागतील.

५३. मंजुर झालेल्या निवीदा धारकास दिलेली कामे मुदतीत करणे बंधनकारक राहील.

५४. निविदा मंजुर करणे अथवा न करणे अथवा काम समाधान कारक न केल्यास सदर निविदा रद्द करणे, अनामत रक्कम जप्त करणे या बाबतचे सर्व हक्क समितीने स्वतः कडे राखुन ठेवले आहेत.

५५. कंत्राटदाराच्या मजुरांचा या प्रक्षेत्रवरील इतर कामात उपद्रव होणार नाही याची काळजी कंत्राटदाराने घ्यावयाची आहे.

५६. या निविदासंदर्भात काही कायदेशीर अडचणी निर्माण झाल्यास त्या संबधीचा खटला पुणे न्यायालयातच चालेल.

५७. या प्रक्षेत्रवरील कलमे अथवा इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाही.

५८. मातृ वृक्षावरुन कलम काडया काढतांना झाडांचे नुकसान झाल्यास होणाऱ्या नुकसानीची भरपाई कंत्राटदारास द्यावी लागेल.

---

नियम व अटी मान्य असलेबद्दल निवीदाधारकाची सही , नाव व पुर्ण पत्ता

सही -------------------------------

नाव -------------------------------

पत्ता -------------------------------

-------------------------------